# प्रेस नोट

गुरुवार दि. ०९/०८/२०१८ रोजी मराठा क्रांती मोर्चा व इतर संघटनेतर्फे पुकारण्यात आलेला महाराष्ट्र बंदच्या अनुषंगाने **कोथरुड पोलीस स्टेशन** हद्दीमध्ये सकल मराठा समाजाचे वतीने चांदणी चौक या ठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. आंदोलनकर्त्यांनी माजी आमदार चंद्रकांत मोकाटे याने व बंदोबस्तावरील पोलीस अधिका-यांनी विनंती केले नंतर आंदोलनकर्ते बाजुला झाले. सदर आंदोलनानंतर काही समाजकंटकांनी व गुन्हेगारी प्रवृतीच्या लोंकानी दगड फेक केली. त्यामध्ये बंदोबस्तावरील ०५ पोलीस कर्मचारी जखमी झाले व ०२ पोलीस वाहनांच्या काचा फोडलसदर लोकांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी प्रतिकार केला. पोलीसांनी योग्य बळाचा वापर करुन ८३ लोकांना ताब्यात घेण्यात आले असुन, कोथरुड पो.स्टेशन कारवाई करीत आहे.

**बंडगार्डन पोलीस स्टेशन** हद्दीमध्ये सकल मराठा मोर्चाच्या वतीने सकाळी ११.०० ते १३.०० वा. चे दरम्यान जिल्हाधिकारी कार्यालय पुणे या ठिकाणी ठिय्या आंदोलनाचा कार्यक्रम आयोजित केलेला होता. आंदोलन कर्त्यांच्या वतीने सकल मराठा क्रांती मोर्चा समन्वयक श्री. शांताराम कुंजीर, राजेंद्र कोंढरे, तुषार काकडे, बाळासाहेब अमराळे, दत्तात्रय गायकवाड, विकास पासलकर, अण्णा ढेरे, भरकुडे पाटील, कमल सावंत असे प्रमुख कार्यकर्त्यांनी त्यांचे मागण्याचे निवेदन मा. जिल्हाधिकारी सो, यांना दिलेनंतर कार्यकर्त्यांना निघुन जाण्याचे आवाहन केले.

सदर आंदोलन संपल्यानंतर काही समाज कंटक व गुन्हेगार प्रवृतीच्या लोंकानी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मेन गेट व संरक्षण भिंतीवरुन आत येण्याचा प्रयत्न केला असता त्यांना बंदोबस्तावरील पोलीसांनी रोखले असता, त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालच्या मेन गेटचा कडीकोयंडा, संरक्षण भिंतीवरील दिवे व गेट लगत असलेले सुरक्षा केबिनची काच फोडुन, नुकसान केले. सदर घटनेबाबत ०५ महिला व ७६ पुरुष यांना पुढील कारवाईकामी ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी प्रतिकार केल्याने त्यांचेवर योग्य बळाचा वापर करुन ताब्यात घेण्यात आलेले असुन त्यांचेवर बंडगार्डन पोलीस स्टेशन कारवाई करीत आहे.

**डेक्कन पोलीस स्टेशन** खंडोजी बाबा चौक येथे आंदोलकांनी या ठिकाणी ठिय्या आंदोलन केले असता, २१ लोकांना ताब्यात घेतले आहे.

**पिंपरी पोलीस स्टेशनच्या** कार्यक्षेत्रातील सकाळी ११.०० ते १७.१५ वा. दरम्यान आंबेडकर पुतळा चौक, पिंपरी पुणे याठिकाणी कुणाल साठे, बजरंग दल, शहर अध्यक्ष यांचे नेतृत्वाखाली ठिय्या आंदोलन करण्यात आले. सदर वेळी ९०० ते १००० जनसमुदाय हजर होता. अशी प्रमुख आंदोलने झालेली असुन, शहरात इतर ठिकाणी ९ ते १० ठिकाणी छोटे - मोठे आंदोलने शांततेत पार पडलेली आहेत.

पोलीस अधिकारी व कर्मचारी असा एकुण ६२५० बंदोबस्त तैनात करण्यात आलेला होता.